RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - ११, अंक - ४ ] शनिवार, एप्रिल ९, २०२२ / चैत्र १९, शके १९४४ [ पृष्ठे २

**असाधारण क्रमांक ४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महापालिका आयुक्त यांजकडून**

**पुणे महानगरपालिका, पुणे**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० (१) व ६० (२) अन्वये नगर रचना परियोजना तयार करणेबाबत सुधारित उद्‌घोषणा (उद्देश).*

***जाहीर सूचना***

क्रमांक म.आ./टी.पी./जा/००३/२०२२.--पुणे महानगरपालिका सभा ठराव क्रमांक १००३, दिनांक १० मार्च २०२२ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० *(१)* मधील तरतुदींनुसार पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या फुरसुंगी गावामध्ये नकाशात दर्शविलेल्या क्षेत्रासाठी नगर रचना परियोजना क्रमांक १०, फुरसुंगी तयार करण्याचा सुधारित इरादा जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने सदर नगर रचना परियोजना तयार करण्याबाबतचा सुधारित उद्देश उक्त अधिनियमाचे कलम ६० *(२)* अन्वये या जाहीर सूचनेद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० *(३)* मधील तरतुदींनुसार सुधारित उद्देशाची नक्कल व नगर रचना परियोजना क्रमांक १०, फुरसुंगीमध्ये अंतर्भूत असलेले क्षेत्र (गुलाबी रंगाच्या किनारीने) दर्शविलेल्या नकाशाची प्रत नगर रचना, परियोजना कक्ष, रूम क्रमांक ३०६, तिसरा मजला, पुणे महानगरपालिका भवन, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५ येथे कार्यालयीन वेळेत, कामकाजाच्या दिवशी नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आले आहे.

प्रस्तुत नगर रचना योजनेमध्ये अंतर्भूत असलेल्या क्षेत्राच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत.

फुरसुंगी-नगर रचना योजना क्रमांक १०.

उत्तरेस : मौजे कदमवाक वस्ती गावाची हद्द.

दक्षिणेस : फुरसुंगीमधील नगर रचना योजना क्रमांक ९ ची हद्द व पूर्व, पश्चिम वाहणारा नाला.

पूर्वेस : मौजे लोणी काळभोर गावाची हद्द व फुरसुंगी गावामधील सर्व्हे नंबर ६०, ६१, ६४.

पश्चिमेस : फुरसुंगी गावामधील सर्व्हे नंबर ८, १५, १६, २८, २९, ३१, ३२, ३३, ४२, ४३, ४४, ४९, ५३ व सर्व्हे नंबर ३४, ३५, ३६, ५४, ५५, ५६ मधील DSK Special Township Project 'Dream City' ची हद्द.

**विक्रम कुमार,**

महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका, पुणे.

पुणे, ७ एप्रिल २०२२.

## BY MUNICIPAL COMMISSIONER

## Pune Municipal Corporation, Pune

*Declaration of Revised Intention to prepare the Town Planning Scheme under Section 60* (1) *and 60* (2) *of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.*

### *Public Notice*

क्रमांक म.आ./टी.पी./जा/००३/२०२२.—The Pune Municipal Corportion, Pune *vide* its General Body Resolution No. 1003, dated 10th March 2022 has resolved its revised intention to prepare the Town Planning Scheme No. 10, Fursungi, in accordance with the provision of Section 60 *(1)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. Accordingly, *vide* this Public Notice hereby declares its revised intention to prepare the said Town Planning Scheme under Section 60 *(2)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.

In accordance with the provision of Section 60 *(2)* the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, a copy of the declaration along with the plan showing the area to be included in the Town Planning Scheme No. 10, Fursungi (shown in pink verge) is kept open for inspection of the public in the office of the Town Planning Scheme Cell, Room No. 306, third floor, Pune Municipal Corportion, Shivajinagar, Pune-411 005 during office hours on all working days.

The area included in the Town Planning Scheme is bounded as stated below.

Fursungi Town Planning Scheme No. 10.

On the North : Mouje Kadamwak Vasti village boundary.

On the East : Mouje Loni Kalbhor village boundary and Fursungi Sr. Nos. 60, 61, 64.

On the South : Boundary of Town Planning Scheme No. 9 of Fursungi village and Nala.

On the West : Fursungi Sr. Nos. 8, 15, 16, 28, 29, 31, 32, 33, 42, 43, 44, 49, 53 and boundary of DSK Special Township Project 'Dream City' in Survey Nos. 34, 35, 36, 54, 55, 56.

**VIKRAM KUMAR,**
Municipal Commissioner,
Pune Municipal Corporation,
Pune.

Pune, 7th April 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.